f/sujay/circular

# मुंबई विद्यापीठ

क्र.संलग्नता/आयसीसी/(२०२३–२४)/४०/२०२४

## परिपत्रक:

विषय: महाविद्यालयीन युवक–युवतींना रोजगारक्षम बनविण्यासाठी आपल्या महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करणेकरीता पुढाकार घेणेबाबत...

संदर्भ: मंगलप्रभात लोढा, मंत्री कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मंबई–४०० ०३२ यांचे जा. क्र. मंत्री कौ. उद्या. रोज, नावि./टिप्पणी/०३९/२०२४ दिनांक ०९ जानेवारी, २०२४.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना सदर परिपत्रकाद्वारे खालील प्रमाणे कळविण्यात येते की,

भारत देशाला संबंध जगाची कौशल्य राजधानी बनविण्याचा संकल्प मा. प्रधानमंत्री महोदय श्री. नरेंद्र मोदीजी यांनी सन २०१४ मध्ये जाहीर केला आहे. रोजगाराबाबत बदलत्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिस्थितीत कौशल्य विकास व उद्योजकतेस अधिक प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाने माहे जानेवारी २०१५ मध्ये स्वतंत्र कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाची स्थापना केली आहे.

युवकांना विविध क्षेत्रांमधील रोजगार उपलब्ध करुन देणे, स्वयंरोजगार करु इच्छिणा–या उमेदवारांना अर्थसहाय्य प्रदान करणे, कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या माध्यमातून उमेदवारांना रोजगारक्षम बनविणे ही सध्याच्या काळाची गरज पूर्ण करण्याच्या हेतूने राज्य शासनाच्या तसेच केंद्र शासनातील विविध विभागांतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षणाशी निगडीत सर्व योजना व कार्यक्रमांखाली निधीची सांगड घालून एकात्मिक अंमलबजावणीद्वारे कार्यप्रवण वयोगटातील उमेदवारांची अधिक मागणी असलेल्या क्षेत्राच्या आवश्यकतेनुसार व्यावसायिक कौशल्य विकास **(Skill Development)**, कौशल्य वर्धन **(Up-skilling)** पुनकौशल्य विकास **(Reskilling)** करण्यात येत आहे.

**National Skills Qualification Framework (NSQF)** अन्वये स्थापित मानकांनुसार १२०० पेक्षा अधिक व्यावसायिक अभ्यासक्रमाचे संबंधित प्रशिक्षण संस्थांमार्फत उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येत असून सदर कौशल्य प्रशिक्षण **NCF** प्रणालीशी निगडीत आहे. प्रशिक्षणाअंती उमेदवारांचे मूल्यमापन **(Assessment)** आणि प्रमाणीकरण **(Certification)** हे केंद्र शासनाच्या **National**

f/sujay/circular



**Council for Vocational Education Training-NCVET, National Skill Development Corporation-NSDC** आणि **Sector Skill Councils (SSC)** कडील मान्यताप्राप्त मूल्यमापन संस्था **(Assessing Body)** मार्फत करण्यात येते. सदर प्रमाणपत्र राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त आहे.

आपल्या महाविद्यालयात कौशल्य प्रशिक्षण केंद्र स्थापन करून युवक युवतीना कौशल्य प्रशिक्षण प्रदान करून त्यांना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात. उपरोक्त विषयासंदर्भात मार्गदर्शकतत्व खालील प्रमाणे असतील.

१. सदर कौशल्य केंद्रांच्या माध्यमाने जास्तीत जास्त महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सहभाग घेता येईल.

२. राज्य शासनामार्फत कौशल्य प्रशिक्षण घेऊ इच्छिणा—या विद्यार्थ्यांना नि:शुल्क स्वरूपात प्रदान करण्यात येईल, या करीता केंद्र शासनामार्फत निश्चित केलेल्या **Common Cost Norms** नुसार कौशल्य विकास केंद्रांना विविध टप्प्यांमध्ये प्रशिक्षण शुल्क अदा करण्यात येते. त्यामुळे महाविद्यालयांवर आर्थिक बोजा येणार नाही त्या संदर्भातील माहित आपणास खालील वेबसाईट वर मिळेल.

३. सदर प्रशिक्षणासाठी महाविद्यालय सहयोगी संस्था म्हणून स्थानिक बिगर सरकारी संस्था (NGO), ट्रेड बॉडी किवा औद्योगिक संस्था यांना महाविद्यालय सोबत घेऊ शकते.

४. प्रशिक्षणाची माहिती देण्याकरिता प्रचार—प्रसार करताना महाविद्यालयाचे नाव तसेच सहयोगी संस्थेचे नाव त्यामध्ये वापरू शकता.

५. सदर कौशल्य केंद्रांच्या माध्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विविध स्वयंरोजगार तसेच विश्वकर्मा योजनांची माहिती दिली जाणार आहे.

६. महाराष्ट्रातील एकूण सर्व महाविद्यालयापैकी त्वरित स्वारस्य दाखविणाऱ्या केवळ १०० महाविद्यालयांना कौशल्य केंद्रांची मान्यता देण्यात येणार आहे. या करीता गुगल फॉर्म लिक तयार करण्यात आली असून त्याद्वारे आपल्या महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यासाठी २६ जानेवारी, २०२४ पर्यंत अर्ज करावयाचा आहे.

**MSSDS Land Line No. 022 22625651/53**
**Web site-https://kaushalya.mahaswayam.gov.in**
**[Google from link: https://forms.gle/kSl3TCXw7LbeaC3n8]**

उपरोक्त बाबतीत मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना आवाहन करण्यात येते कि, गुगल फॉर्म लिक वरील आवश्यक तो माहिती भरावी व सदर योजनेसाठी विहित मुदतीत अर्ज करावा, सूचनांचे पालन करण्यात यावे.

Balirama

मुंबई—४०० ०३२
२४ जानेवारी, २०२४

(प्रा. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना.

PVC/ICD/2023-24/362

जा.क्र.मंत्री कौ. उद्यो.रोज.,नावि.,/टिप्पणी/ 50 /२०२४दि.

**मंत्री**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता**
यांचे कार्यालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : 11 JAN 2024

प्रति,

**डॉ. आर.डी.कुलकर्णी,**
**मा. कुलगूरू,**
**मुंबई विद्यापीठ,**
**मुंबई, महाराष्ट्र राज्य.**

**विषय:- राज्यातील १०० महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करणेबाबत.**

महोदय,

महाराष्ट्र राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री, मा.ना.श्री. मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून राज्यातील १०० महाविद्यालयांमध्ये काळाशी सुसंगत असे कौशल्य विकास केंद्रे स्थापन करण्यात येणार आहेत. या केंद्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच व्यवसायाचे कौशल्य देण्यात येणार आहे. यासाठी मा. मंत्री महोदयांनी राज्यातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पत्र लिहून कौशल्य विकास केंद्र मिळविण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन केलेले आहे.

आपणांस विनंती करण्यात येते की, हे पत्र आपण आपल्या विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांना पाठवावे, जेणेकरून त्यांना विहीत वेळेत अर्ज करता येईल.

सहकार्याच्या अपेक्षेत...

आदरपूर्व सादर...

(दिलीप द्विवराळे)
**खाजगी सचिव**

**सोबत:- मा. मंत्री महोदयांचे पत्र**

जा.क्र.मंत्री को उद्या ,रोज.,नावि.,/टिप्पणी/ /२० दि.
039/2024
मंत्री
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : - 9 JAN 2024

प्रति,

**प्राचार्य,**
**सर्व महाविद्यालये.**

**विषय-महाविद्यालयीन युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्यासाठी आपल्या महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करणेकरीता पुढाकार घेणेबाबत...**

भारत देशाला संबंध जगाची कोशल्य राजधानी बनविण्याचा संकल्प **मा. प्रधानमंत्री महोदय श्री. नरेंद्र मोदीजी** यांनी सन २०१४ मध्ये जाहीर केला आहे. रोजगाराबाबत बदलत्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिस्थितीत कौशल्य विकास व उद्योजकतेस अधिक प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाने माहे जानेवारी २०१५ मध्ये स्वतंत्र कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यत्ता विभागाची स्थापना केली आहे.

युवकांना विविध क्षेत्रांमधील रोजगार उपलब्ध करुन देणे, स्वयंरोजगार करु इच्छिणा-या उमेदवारांना अर्थसहाय्य प्रदान करणे, कौशलय विकास प्रशिक्षणाच्या माध्यमातून उमेदवारांना रोजगारक्षम बनविणे ही सध्याच्या काळाची गरज पूर्ण करण्याच्या हेतूने राज्य शासनाच्या तसेच केंद्र शासनातील विविध विभागांतर्गत कोशल्य विकास प्रशिक्षणाशी निगडीत सर्व योजना व कार्यक्रमांखाली निधीची सांगड घालून एकात्मिक अंमलबजावणीद्वारे कार्यप्रवण वयोगटातील उमेदवारांची अधिक मागणी असलेल्या क्षेत्राच्या आवश्यकतेनुसार व्यावसायिक कौशल्य विकास (Skill Development), कौशल्य वर्धन (Up-skilling), पुनकौशल्य विकास (Reskilling) करण्यात येत आहे.

National Skills Qualification Framework (NSQF) अन्वये स्थापित मानकांनुसार १२०० पेक्षा अधिक व्यावसायिक अभ्यासक्रमाचे संबंधित प्रशिक्षण संस्थांमार्फत उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येत असून सदर कौशल्य प्रशिक्षण NCF प्रणालीशी निगडीत आहे. प्रशिक्षणाअंती उमेदवारांचे मूल्यमापन Assessment) आणि प्रमाणीकरण (Certification) हे केंद्र शासनाच्या National Council for Vocational Education Training-NCVET, National Skill Development Corporation-NSDC आणि Sector Skill Councils (SSC) कडील मान्यताप्राप्त मूल्यमापन संस्था (Assessing Body) मार्फत करण्यात येते. सदर प्रमाणपत्र राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त आहे.

मंत्री
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : - 9 JAN 2024

आपल्या महाविद्यालयात कौशल्य प्रशिक्षण केंद्र स्थापन करून युवक- युवतीना कौशल्य प्रशिक्षण प्रदान करून त्यांना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात. उपरोक्त विषयासंदर्भात मार्गदर्शकतत्व खालील प्रमाणे असतील .

१. सदर कौशल्य केंद्रांच्या माध्यमाने जास्तीत जास्त महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सहभाग घेता येईल.

२. राज्य शासनामार्फत कौशल्य प्रशिक्षण घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांना निःशुल्क स्वरूपात प्रदान करण्यात येईल, या करीता केंद्र शासनामार्फत निश्चित केलेल्या Common Cost Norms नुसार कौशल्य विकास केंद्रांना विविध टप्यांमध्ये प्रशिक्षण शुल्क अदा करण्यात येते. त्यामुळे महाविद्यालयांवर आर्थिक बोजा येणार नाही. त्या संदर्भातील माहित आपणास खालील वेबसाईट वर मिळेल.

३. सदर प्रशिक्षणासाठी महाविद्यालय सहयोगी संस्था म्हणून स्थानिक बिगर सरकारी संस्था (NGO), ट्रेड बॉडी किंवा औद्योगिक संस्था यांना महाविद्यालय सोबत घेऊ शकते.

४. प्रशिक्षणाची माहिती देण्याकरिता प्रचार-प्रसार करताना महाविद्यालयाचे नाव तसेच सहयोगी संस्थेचे नाव त्यामध्ये वापरू शकता.

५. सदर कौशल्य केंद्रांच्या माध्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विविध स्वयंरोजगार तसेच विश्वकर्मा योजनांची माहिती दिली जाणार आहे.

6. महाराष्ट्रातील एकूण सर्व महाविद्यालयापैकी त्वरित स्वारस्त्य दाखविणाऱ्या केवळ १०० महाविद्यालयांना कौशल्य केंद्रांची मान्यता देण्यात येणार आहे. या करीता गुगल फॉर्म लिंक तयार करण्यात आली असून त्याद्वारे आपल्या महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यासाठी दि.२६ जानेवारी, २०२४ पर्यंत अर्ज करावयाचा आहे.

आपणास आवाहन करण्यात येते कि, गुगल फॉर्म लिक वरील आवश्यक ती माहिती भरावी व सदर योजनेसाठी विहित मुदतीत अर्ज करावा,

मंगलप्रभात लोढा
(मंगलप्रभात लोढा )

MSSDS Land Line No. 022 22625651 / 53
**Web site** - https://kaushalya.mahaswayam.gov.in
[**Google form link:** https://forms.gle/kS13TCXw7LbeaC3n8]

कार्यालय पत्ता : दालन क्र. २०२, २ रा मजला (मुख्य इमारत), मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दूरध्वनी क्र. : ०२२ २२०० २५३०८ / २२०२ ४५९२, ई-मेल : *min.skills@maharashtra.gov.in*